
वयोवृद्धः मनोयुवा

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.




# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३३ | अंक-१ | किंमत : रु. ३०/- | जानेवारी २०२५

## २०२५ - नववर्षानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!




फेस्कॉम वर्धापन दिन कार्यक्रमप्रसंगी महाराष्ट्राच्या वनखात्याचे मंत्रीमहोदय
**मा. ना. गणेश नाईक** यांचे शुभहस्ते फेस्कॉम मुखपत्र मनोहारी मनोयुवा च्या डिसेंबर महिन्याच्या
मासिकाचे प्रकाशन करणेत आले. याप्रसंगी उपस्थित फेस्कॉम अध्यक्ष
डॉ. आण्णासाहेब टेकाळे, माजी अध्यक्ष अरूण रोडे, आईस्कॉन अध्यक्ष व्ही. के. भदाणे,
भवन समितीचे अध्यक्ष डी.एन.चापके, मुख्य सचिव चंद्रकांत महामुनी,
उपाध्यक्ष अशोक तेरकर, प्रसिद्धी प्रमुख सुरेश पवार व
महिला आघाडीच्या अध्यक्षा मेजर डॉ. सौ. निर्मलाताई कोरे (भोसकर).


# नूतन आधारस्तंभ यांचे अभिनंदन

**श्री. मोहन दत्तात्रय पुजारी**

पत्ता : 'तथास्तु', ३/४५६-२, श्री स्वामी समर्थ नगर, सांगली रोड, इचलकरंजी, जि. कोल्हापूर - ४१६ ११५.

मोबा. : ९४२२३३३४३०

---



**श्री. लक्ष्मण संभाजी धानोरकर**

पत्ता : २०१, शांतीविहार अपार्टमेंट, बालाजी मंदिराजवळ, पारसननगर, नांदेड, जि. नांदेड - ४३१ ६०२.

मोबा. : ९८९००६२१७५

पद : सचिव, ज्येष्ठ नागरिक संघटना, पारसनगर, नांदेड.

---



**सौ. सुशिला ओडेयर**

पत्ता : प्लॉट नं. ३, देवणे कॉलनी, कारंडे मळ्याजवळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

शिक्षण : एम.ए.(मराठी), एम.ए.(समाज), एम.ए.(इतिहास), पीएच.डी.(इति.)

मोबा. : ८४०८०८४४००

पद : फेस्कॉम - संशोधन व विकास, कार्यविस्तार.

---

**'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा**



नुतन वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम : मिरज येथील श्रीमती तानुबाई नायकू मंडले (वय वर्षे १०४) यांचा फेस्कॉम मनोयुवा कौन्सिलचे वतीने सामाजिक कार्यकर्ते मा.संभाजीराव मेंढे आणि युवाशक्ती फहिम खान याचे हस्ते शाल, श्रीफळ व बुके देवून नववर्षानिमित्त शुभेच्छांसह सत्कार. सोबत फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान व १००+ आजींचे कुटुंबीय.

एँथोनी जोसेफ मुंदडाईन
जन्म - १४ डिसेंबर १९२३
पत्ता - डी-६, एव्हरर्ड नगर, चुनाभट्टी, मुंबई.
मोबा. - ९८७०२१९८९७



श्री. आण्णासाहेब टेकाळे
फेस्कॉम अध्यक्ष
मो. ७०२१२८८२८५

# अध्यक्षीय मनोगत...

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ म्हणजेच फेस्कॉमच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्या-नंतर होणारे हे पहिलेच अधिवेशन. सर्वप्रथम मी येथे उपस्थित असलेल्या सर्व सहकाऱ्यांना आणि राज्यातील तमाम जनतेला हे नवीन वर्ष सुखाचे, समृद्धीचे, भरभराटीचे आणि आरोग्यदायी जावो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

फेस्कॉमचे हे अधिवेशन लातूरसारख्या महत्त्वाच्या शहरात भरत आहे. मी तसा धाराशिव जिल्ह्याचा रहिवासी आहे. पूर्वी लातूर हा आमच्याच धाराशिव जिल्ह्याचा भाग होता. त्यामुळे लातूर शहराविषयी मला विशेष प्रेम आहे. माननीय शिवाजीराव पाटील निलंगेकर आणि माननीय विलासरावजी देशमुख असे दोन मुख्यमंत्री या जिल्ह्याने राज्याला दिले. कामाच्या निमित्ताने या दोन्ही नेत्यांना अनेकदा भेटण्याची संधी मिळाली. दुर्दैवाने हे दोन्ही नेते आज आपल्यात नाहीत. पण लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी यांनी केलेले कार्य विसरता येणार नाही. देशाच्या लोकसभेचे माजी अध्यक्ष तसेच माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकरजी हे सुद्धा याच लातूरचे. लातूर भूषण व्यक्तिमत्त्वांची यादी करायला बसलो तर खूप मोठी बनेल. असे अनेक रथी महारथी या जिल्ह्याने महाराष्ट्राला दिले. या ऐतिहासिक लातूर शहरात आपले अधिवेशन भरत आहे याचा खूप आनंद वाटतो.

अधिवेशनास जमलेल्या वयाने ज्येष्ठ परंतु मनाने तरुण असलेल्या सर्व प्रतिनिधींचे फेस्कॉमचा अध्यक्ष म्हणून मी मनापासून स्वागत करतो आणि त्यांचे आभारही मानतो. फेस्कॉम हे नाव महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही जिथे जिथे मराठी माणूस आहे तिथपर्यंत पोहोचले आहे. पण नुसते नाव पोहोचले म्हणजे संस्था मोठी होत नसते. त्यासाठी कार्यक्षम आणि कर्तव्य कठोर पदाधिकारी हितचिंतकांची संघटनेला नेहमीच गरज असते. आपली ही संस्था स्थापन होऊन ४५ वर्षे झाली. मी गेली १८ वर्षे या संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता आहे. वेगवेगळी पदे भूषवल्यानंतर आता माझ्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी आलेली आहे. माझ्या अगोदर मा. डॉ. शं. पा. किंजवडेकर, मा. घोलप साहेब, मा. म. भा. कुलकर्णी, मा. कोडोलीकर, मा. दत्तात्रय चौधरी, मा. अरुण रोडे, .... अशा अनेक मान्यवरांनी हे पद भूषवले आहे. त्यांनी अत्यंत कष्टाने आणि जिद्दीने ही संस्था वाढवली आणि जोपासली आहे. या लोकांनी प्रचंड काम केले. हेच काम आपल्याला पुढे चालवायचे आहे. अध्यक्षपद ही एक तांत्रिक जबाबदारी आहे.

कोणतीही संघटना एकट्या अध्यक्षाच्या बळावर मोठी होत नसते. त्याला हजारो हातांची मदत मिळते तेव्हा संघटना काहीतरी भरीव काम करू शकते. वयाच्या साठीनंतर नोकरीतून आपण निवृत्त झालेलो असतो. कौटुंबिक जबाबदाऱ्या बहुतांशपणे पार पडलेल्या असतात. मुलेबाळे आपापल्या नोकरी किंवा व्यवसायात स्थिरावलेले असतात. त्यामुळे काम करण्यासाठी आपल्याकडे भरपूर वेळ असतो. साठीनंतरचे ज्येष्ठांचे आयुष्य समाधानाचे, आनंदाचे जावो यासाठीच १९८० साली फेस्कॉम या संघटनेची स्थापना झाली.

ही संघटना स्थापन होऊन ४४ वर्षे झाली. आपली ही संघटना पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० तसेच सोसायटीज ॲक्ट १८६० अन्वये धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आहे. संस्था किंवा संघटना चालवण्यासाठी

नियम आवश्यक असतात. यासाठीच फेस्कॉम या संघटनेचीही स्वतंत्र नियमावली किंवा घटना आहे. संस्थेच्या संपूर्ण कामाची माहिती दरवर्षी ठराविक नमुन्यात धर्मादाय आयुक्त कार्यालयात द्यावी लागते. फेस्कॉमचे मुख्यालय नेरूळ, नवी मुंबई येथे आहे. आपल्या महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत. सर्वच जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिक राहत असल्याने संघटनेला काम करणे सोपे जावे म्हणून राज्यभरात संघटनेचे १४ प्रादेशिक विभाग कार्यरत आहेत. त्या त्या विभागातील जिल्ह्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या संघटना स्थापन करून त्या फेस्कॉमला संलग्न करण्याचे काम अव्याहत चालू असते. देशभरात १५ कोटी तर राज्यात दीड कोटी ज्येष्ठ नागरिक आहेत. महाराष्ट्रातील ३६ जिल्हे, २५७ तालुके आणि ४०, २३३ गावे आहेत. या सर्व ठिकाणचे मिळून साधारण साडेपाच हजार ज्येष्ठ नागरिक संघ कार्यरत आहेत.

ढोबळ मानानुसार १६ ते १७ लाख सभासद हे संलग्न आहेत. ही संख्या तशी कमी आहे. या पुढील काळात क्रियाशील सदस्य बनवण्यावर भर देणे अत्यंत गरजेचे आहे. माझ्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत ही संख्या किमान २० लाखांपर्यंत जावी असा मानस आहे. त्या दृष्टीने मी आणि माझी कार्यकारणी तसेच प्रादेशिक विभागातील पदाधिकाऱ्यांनी काम करावे अशी अपेक्षा आहे. हे काम खूप अवघड आहे असे वाटत नाही. फक्त प्रत्येक सभासदाने दिवसातील किमान दोन तास संघटनेसाठी दिले तरी फेस्कॉमचा विस्तार झपाट्याने होऊ शकेल. प्रत्येक आपल्या विभागातही आणखी चांगले काम झाले पाहिजे अशी जिद्द आणि आत्मविश्वास सर्व प्रादेशिक विभागांनी आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी दाखवली तर हे काम जलद गतीने होऊ शकेल असा मला विश्वास आहे.

फेस्कॉमच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आपण 'फेस्कॉम ज्येष्ठांच्या दारी' ही अभिनव मोहीम राबवली. वयाची शंभरी पूर्ण केलेल्या वृद्ध महिला आणि पुरुषांचा आपण त्यांच्या घरी जाऊन सन्मान केला. राज्यात चांद्यापासून बांद्यापर्यंत सर्वत्र हे अभियान राबवले गेले. आधी वाटत होते शंभरी पार केलेले दोन-चार लोक मिळतील परंतु जसजशी सर्व जिल्ह्यांतून माहिती गोळा होत गेले तेव्हा काही ठिकाणी तीस तर काही ठिकाणी शंभरी पार वीस महिला आणि पुरुष आढळले. फेस्कॉमच्या पदाधिकाऱ्यांनी घरी येऊन आपला सत्कार केल्याबद्दल त्यांनाही खूप आनंद झाला. यासारखे वेगळे आणि चांगले उपक्रम आपल्याला येणाऱ्या काळात राबवायचे आहेत. त्यासाठी प्रादेशिक विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी सूचना कराव्यात. या पूर्वीच्या मा. ना. एकनाथरावजी शिंदे हे मुख्यमंत्री असताना ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लागले.

१) ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या सर्व बसेसमधून मोफत प्रवास.

२) शाळकरी मुलींपासून ते वयाची ७५ पर्यंत महिलांना बस भाड्यात ५० टक्के सवलत.

३) साठ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य तपासणी.

४) प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली.

५) महात्मा फुले जन आरोग्य विभागाच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय तक्रार निवारण समित्यांवर ज्येष्ठांना प्रतिनिधित्व दिले.

६) महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत सर्व नागरिकांना मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ मिळणे, यासाठीची जी दीड लाखांची मर्यादा होती ती पाच लाखांपर्यंत सरसकट वाढवली.

७) या सोई सुविधा यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एका प्रशासकीय यंत्रणेची मागणी होती त्यासाठी शासनाने ज्येष्ठ नागरीक कल्याणकारी

महामंडळाची स्थापना केली.

८) महानगरपालिका स्तरावर देखील स्थानिक प्रवास सवलत ठाणे, नवी मुंबई महानगरपालिका यांच्याकडून सुरू करता आली.

असे अनेक चांगले निर्णय मा. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या सरकारने घेतले. ज्येष्ठ नागरीक यांना सर्वात जास्त सोयी सवलती देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सरकारने असे निर्णय घ्यावेत यासाठी फेस्कॉमच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी, मान्यवर यांनी मला वेळोवेळी मदत केली, मार्गदर्शन केले, सहकार्य केले हे सांगताना मला अत्यंत आनंद व समाधान होत आहे.

**सबका साथ, सबका विकास...**

ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत ते सोडवण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय निर्माण करणे, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या जलद गतीने सोडवण्यासाठी येणाऱ्या काळात राज्यात स्वतंत्र मंत्रालय कार्यान्वित होण्याची गरज आहे. अनेक प्रश्न आपल्याला शासन दरबारी पाठपुरावा करून सोडवायचे आहेत. प्रामुख्याने उल्लेख करायचा झाला तर परवाच नांदेड / नागपूर येथे झालेल्या प्रादेशिक विभागाचे मेळाव्यात काही मागण्या पुढे आल्या आहेत त्यांचाही आपण शासन दरबारी पाठपुरावा करू.

१) ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे प्रवासात असलेली ५०% /४०% सवलत पुन्हा सुरू करणे.

२) आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात ज्येष्ठ नागरिकांना अनुक्रमे ४००० आणि ३००० रुपये पालन व पोषण भत्ता म्हणून दिला जातो. हीच योजना महाराष्ट्र सरकारने सुरू करावी आणि त्यासाठी प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला सरसकट किमान ३००० रुपये मिळावेत यासाठी प्रयत्न करणे.

३) ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महामंडळावर आपल्या फेस्कॉम या संघटनेला ५०% प्रतिनिधित्व मिळावे असा आग्रह धरणे.

४) केंद्र सरकारचे आर्थिक लाभ मिळण्यासाठी ६५ वर्षांची अट रद्द करून ती ६० करावी यासाठी प्रयत्न करणे. तसेच एस टी प्रवासास देखील ६० पासून सवलत देण्यात यावी

५) ग्रामपंचायत पासून ते महापालिकेच्या बजेटमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी तीन ऐवजी पाच टक्के तरतूद करावी.

६) ज्येष्ठ नागरिकांना अडचणीच्या वेळी तातडीने वैद्यकीय मदत मिळण्यासाठी (गोल्डन अवर) 'हॉस्पिटल्स ऑन व्हील' ही सेवा राज्यभर सुरू करावी.

७) गांव पातळीपर्यंत विरंगुळा केंद्र सरकारने ऊभी करावीत.

८) आर्थिक लाभातील उत्पन्नाची मर्यादा २१००० ऐवजी १ लाख करावी.

अशा काही प्रमुख मागण्यांसाठी आपणास सरकारकडे पाठपुरावा करावा लागणार आहे. याबाबत सर्व प्रादेशिक विभाग स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी स्थानिक पालकमंत्री, खासदार, आमदार महोदयांना अशा आशयाचे निवेदन द्यावे जेणेकरून राज्य मंत्रिमंडळात या आशयाचा प्रस्ताव मंजूर करणे शक्य होईल. अजून बरेच काही आपणास साध्य करावयाचे आहे. त्याविषयी नंतर वेळोवेळी चर्चा आणि विचारमंथन होईलच. तूर्त इथेच थांबतो. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

२०२५ हे वर्ष राज्यातील दीड कोटी ज्येष्ठ नागरिकांना आनंदाचे, सुखाचे, समाधानाचे आणि आरोग्यदायी जावो ही परमेश्वर चरणी पुन्हा एकदा प्रार्थना करतो.

धन्यवाद.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

* * *

# ज्येष्ठ नागरिक धोरण – गृह विभागाकडून अपेक्षा

अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख मनोयुवा कौन्सिल

केंद्र शासनाच्या ज्येष्ठ नागरिक धोरण निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाने २०१३ मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिक धोरण मंजूर केले. काही वर्षे शासनाचे धोरण कागदावरच राहिले. या धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी दि. ९/७/२०१८ रोजीच्या निर्णयाने शासनाने आदेशित केले. सदर शासन निर्णयानुसार शासनाने विविध शासकीय विभागांवर ज्येष्ठांची जबाबदारी सोपविली आहे. ज्येष्ठ नागरिक धोरण अंतर्गत सर्व शासन निर्णय, परिपत्रके, पत्रे 'मनोहारी मनोयुवा' मासिकाद्वारा ज्येष्ठ नागरिक संघ/वाचक यांचेपर्यंत पोहचविले आहेत. या शासन निर्णयानुसार प्रत्येक शासकीय विभागाने अंमलबजावणी करणे आवश्यक असले तरीही या धोरणांची प्रादेशिक/जिल्हा पातळीवरील शासकीय विभागांकडून अंमलबजावणी करून घेणेची सर्वस्वी जबाबदारी प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांचीच आहे. फेस्कॉम शासनाकडून विविध मागण्या मान्य करून घेत आहे, परंतु प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष अकार्यक्षम असतील तर धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी नाही हे सत्य नाकारुन चालणार नाही.

प्रादेशिक/ जिल्हास्तरावर धोरण अंमल-बजावणीबाबत विविध विभागाकडून काय अपेक्षित आहे व त्यासाठी काय प्रयत्न आवश्यक आहेत याचा उहापोह करणेचा प्रयत्न सुरू करीत आहोत. या महिन्यातील अंकापासून गृह (पोलीस) खात्यापासून मार्गदर्शनपर लेख देत आहोत. यासाठी प्रथमतः खालील शासन निर्णय/परिपत्रके/पत्रांचा पूर्णतया अभ्यास प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांनी करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १) शासन निर्णय क्र. ज्येष्ठना २०१६/प्रक्र-७१/ सामासु दि. ९ जुलै २०१८ | राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ ची अंमलबजावणी बाबत. |
| २) आई वडील व ज्येष्ठ नागरिकांची देखभाल आणि कल्याण कायदा २००७ नियम २०१० | प्रकरण – सहा<br>ज्येष्ठ नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण. |
| ३) विशेष पोलीस महानिरीक्षक (का व सु) यांचेकडील परिपत्रक क्र. लोमसं/२४/३४/ ज्येष्ठ नागरिक/२०६/२०१० दि. २८/०१/२०२३ | ज्येष्ठ नागरिक सुरक्षा समिती/ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबतची योजना. |
| ४) शासन परिपत्रक क्र. व्हीआयपी ०८१८/प्रक्र ४६४/पोल-१३ दि. १०/०९/२०१८ (गृह विभाग) | राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत. |
| ५) शासन निर्णय क्र . डीडीपी-२०१९/प्रक्र ३११/ सामासु दि. ३१/१०/२०१९ | 'जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती' गठण करण्याबाबत. |

| | |
|---|---|
| ६) गृह विभागाचे मा. पोलीस महासंचालक यांना लिहिलेले पत्र क्र. ६३९३५८/एचडी-५८०२०/६/२०२३-पोलीस एमएचडी-गृह विभाग दि. १० जुलै २०२३ | ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत. |
| ७) विशेष पोलीस महानिरीक्षक (का व सु) मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. पोमसं/२०/१९५/Community Policing Scheme/१७७/२०१९ दि. २८/२/२०२४ | ज्येष्ठ नागरिक सुरक्षा समिती व सहाय्यता कक्ष स्थापन करणेबाबत |
| ८) शासनाने पोलीस महानिरीक्षक यांना लिहिलेले स्मरणपत्र क्र. 639358/HD-58020/6/2023 - POL 13-MHD-Home Department Dt. 18/11/2024 | ज्येष्ठ नागरिक धोरण ज्ये.ना. समिती व कक्ष टोल फ्री हेल्पलाईन सुरू करणेबाबत. |

जिल्ह्यातील गृह विभागावर शासनाने कोणती जबाबदारी सोपविली आहे याचा प्रथमतः प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांनी अभ्यास करणे आवश्यक आहे. स्वतःचा पूर्णतया अभ्यास असलेखेरीज पोलीस विभागाचे अधिकारी यांचेसमोर विषय मांडता येणार नाही.

या विभागाकडून शासनाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करुन घ्यावयाच्या असलेस प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांनी जिल्हास्तरावरील मा. पोलीस अधिक्षक, मा. पोलिस आयुक्त, मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांचेशी सतत संपर्क साधणे व चर्चा करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक पोलिस निरीक्षक (पोलीस ठाणे) यांनी वरील निर्णय / परिपत्रकानुसार कार्य करणे आवश्यक असलेने सर्व पोलीस ठाण्यांना मा. पोलीस अधिक्षक यांचेकडून आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे. जिल्हा स्तरावरील या अधिकाऱ्यांशी जवळीक साधली तरच धोरण अंमलबजावणीचे कार्य सुलभ होऊ शकणार आहे. जिल्हास्तरावरून सर्व पोलीस ठाण्यांना सुचना गेलेनंतर सुध्दा प्रादेशिक/जिल्हा/तालुका समन्वय समित्यांचे अध्यक्ष यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांशी सतत संपर्क ठेऊन जिल्हास्तरावरून प्राप्त सूचनांनुसार कामाचा पाठपुरावा करावा लागणार आहे. प्रादेशिक विभागाचे अध्यक्षांना 'पिलर' संबोधिले आहे. जर एखाद्या पोलीस ठाण्यात, मा. पोलीस अधिक्षक यांनी आदेश होऊनही कार्य होत नसेल तर त्याबाबत प्रादेशिक विभागाचे अध्यक्षांनी सदरची बाब त्यांचे निदर्शनास आणली पाहिजे.

वरील शासन निर्णय, परिपत्रके अगर स्मरणपत्रे अन्वये पोलीस खात्याकडून ज्येष्ठ नागरिक धोरणाअंतर्गत खालील कामाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. शासनाने सूचना दिलेल्या आहेत पण अंमलबजावणी करून घेणेची फार मोठी जबाबदारी प्रादेशिक विभागाचे अध्यक्षांवर आहे. फेस्कॉम राज्य पातळीवर, जिल्हा स्पतावर, ज्येष्ठांसाठी कार्य करते याचा जिल्हास्तरावर पाठपुरावा केला नाही तर फेस्कॉम करीत असलेले कार्य पूर्णत्वास जाऊ शकणार नाही.

१) ज्येष्ठ नागरिकांचा विविध स्तरापासून होणारा छळ, पिळवणूक यापासून ज्येष्ठांचे संरक्षण.

२) ज्येष्ठ नागरिकासाठी विनामूल्य हेल्पलाईन सुरु करावी. हेल्पलाईनबाबत वृत्तपत्र/मोबाईल द्वारा सर्वत्र प्रसार व्हावा.

३) आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी आपत्कालीन सतर्क करणारी यंत्रणा विकसीत करावी. (Emergency Alert System)

४) **ज्येष्ठ नागरिकंच्या जीविताचे मालमत्तेचे संरक्षण –**

१) पोलीस अधिक्षक, पोलीस ठाणे या ठिकाणी 'ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष' गठीत करावा.

२) पोलीस ठाण्यामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकाकी जीवन जगणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची यादी असावी.

३) एकाकी जीवन जगणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची यादी पोलीस ठाण्यांना गावातील पोलीस पाटील यांचेकडून मिळू शकते. ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक संघाने पोलीस ठाण्यास, या कार्याबद्दल सहकार्य करावे.

४) एकाकी जीवन जगणाऱ्या ज्येष्ठ नागरिकास बीट अंमलदार यांनी महिन्यातून किमान एक वेळ भेट देऊन विचारपूस करावी.

५) ज्येष्ठ नागरिकांचा छळ/मारहाण/जबरदस्ती होत असेल तर ज्येष्ठ नागरिकाला न्याय देणेचे कार्य घडावे.

६)आईवडील व ज्येष्ठ नागरिक कायद्यांतर्गत निर्वाह भत्ता दिला जात नसेल तर निर्वाह भत्त्याबाबत सहकार्य करावे.

७) प्रत्येक पोलीस ठाण्यात त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावातील ज्येष्ठ नागरिकांची, पोलीस पाटील यांचेसह सभा घ्यावी व व्यथा निवारण्याचा प्रयत्न करावा.

८) प्रत्येक पोलीस ठाण्यात त्यांच्या कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक संघटनेतील ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखाली व संबधीत पोलिस स्टेशनमधील अधिकाऱ्यांची एक समिती गठीत करणेत यावी.

९) आई वडील व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ कायद्यान्वये ज्येष्ठ नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणेची जबाबदारी पोलिस खात्याकडे सोपविली आहे.

१०) ज्येष्ठ नागरिक धोरणांतर्गत गृह विभागाकडून अगर त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी यांचेकडून जबाबदारी पूर्ण होत नसेल तर त्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील ज्येष्ठ नागरिक समन्वय व संनियंत्रण समितीचे सभेत चर्चा करावी. प्रादेशिक विभागाने सभेपूर्वी सदरचा विषय चर्चेसाठी ठेवणेसाठी मा. सहा. आयुक्त, समजकल्याण कडे सभेपूर्वी किमान १ आठवडा अगोदर पाठविणे आवश्यक आहे.

पोलीस खात्याकडून ज्येष्ठ नागरिक धोरण अंमलबजावणी करून घेणेची जबाबदारी प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांची असून फेस्कॉमने मिळविलेल्या सुविधा सर्व ज्येष्ठ नागरिकांना मिळवून देणेचा प्रयत्न करावा असे यानिमित्त सुचवावेसे वाटते.

पुढील विभागाबाबत पुढील अंकाल भेटू...

* * *

महाराष्ट्र शासन
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय

धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला, सास्मीरा इमारत,
सास्मीरा रोड, वरळी,
मुंबई-४०० ०३०
दूरध्वनी क्रमांक : ०२२ - २४९३५४३४, २४९३५४९०,
२४९३०४९९, २४९३५५१६
Email Id:- pro.mum-mh@gov.in

Dharmaday Ayukata Bhavan,
2nd Floor, Sasmira Building,
Sasmira Road, Worli,
MUMBAI-४०० ०३०
Tel No.०२२- २४९३५४३४, २४९३५४९०
२४९३०४९९, २४९३५५१६
Website : www.charity.maharashtra.gov.in

संदर्भ – क्रमांकः अंदाज शाखा/न्यासाचे हिशोबपत्रके/5785/२०२४ दिनांक – 26 NOV 2024

## परिपत्रक क्रमांक ६१४/२०२४ दिनांक २६.११.२०२४

सर्व नोंदणीकृत न्यासांच्या विश्वस्तांना सुचित करण्यात येते की, संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणी लक्षात घेवून विश्वस्तांची गैरसोय कमी व्हावी याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम चे कलम ४१ क अन्वये परवानगी प्रकरणे वगळता, सन २०२३ -२४ या आर्थीक वर्षाची न्यासाची हिशोब पत्रके धर्मादाय संघटनेच्या www.charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने जमा करण्याची **अंतिम मुदत दि.३१.१२.२०२४** पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हास्तरीय कार्यालयांनी याची नोंद घ्यावी.

(अमोघ श्या.कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त/धर्मादाय उप आयुक्त/ सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सर्व सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालये
२. परिपत्रक धारीणी
३. संगणक शाखा (संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी)

"रत्नागिरी व सांगली या विभागांमध्ये रा.प. महामंडळाव्दारे चालविण्यात येणाऱ्या शहरी बस वाहतूकीमध्ये महाराष्ट्र राज्यातील महिलांना ५० टक्के, ६५ वर्षे ते ७५ वर्षापर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के तसेच ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के मोफत प्रवास सवलत अनुज्ञेय करणेबाबत.........

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्र. एसटीसी-०३२३/प्र.क्र.१३५/परि-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २१ जून, २०२४

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.एसटीसी-३४००/६३१/प्र.क्र.३१/परि-१, दि.२०.०६.२०००.
२) शासन निर्णय क्र.एसटीसी-३४०१/प्र.क्र.४२/भाग-१/परि-१, दि.०५.१२.२००५.
३) शासन निर्णय क्र.एसटीसी-३४०५/५१५/परि-१,दि.२६.०७.२००६.
४) शासन निर्णय क्र.एसटीसी-०११३/प्र.क्र.१०३/परि-१,दि.१०.०२.२०१४
५) मा.मंत्री(वित्त) यांचे अ.शा.पत्र क्र.संकिर्ण २०१४/प्र.क्र.५२/अर्थबळ,दि.२८.०७.२०१५.
६) शासन निर्णय क्र.एसटीसी-०८१५/प्र.क्र.५५०/परि-१,दि.२५.०२.२०१६.
७) शासन निर्णय क्र.एसटीसी-०२१६/प्र.क्र.७०/परि-१,दि.०३.०५.२०१६.
८) शासन निर्णय क्र.एसटीसी-१०१७/प्र.क्र.५२५/परि-१,दि.०९.०८.२०१८.
९) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे परिपत्रक क्र.राप/वाह/सवलत/म.स.यो./१०७८, दि.१६.०३.२०२३
१०) शासन निर्णय क्र.एसटीसी-०३२३/प्र.क्र.१३५/परि-१,दि.०३.०४.२०२३
११) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे परिपत्रक क्र.राप/वाह/सवलत/४६१, दि.०२.०२.२०२४, दि. १२.०३.२०२४
१२) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३८/अर्थसंकल्प-३, दि.२०.०३.२०२४

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाव्दारे चालविण्यात येणाऱ्या शहरी बस वाहतूकीमध्ये रत्नागिरी व सांगली या विभागामध्ये महाराष्ट्र राज्यातील महिलांना व ज्येष्ठ नागरीकांना प्रवास सवलत अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

रत्नागिरी (१० बस) व सांगली (४० बस) या विभागामध्ये रा.प. महामंडळाव्दारे चालविण्यात येणाऱ्या शहरी बस वाहतूकीमध्ये महाराष्ट्र राज्यातील महिलांना ५० टक्के प्रवास सवलत, महाराष्ट्र राज्यातील ६५ वर्षे ते ७५ वर्षापर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के प्रवास सवलत तसेच महाराष्ट्र राज्यातील ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के मोफत प्रवास सवलत रत्नागिरी व सांगली जिल्ह्यातील शहर बस सेवा टप्प्या टप्प्याने बंद करण्यात येईल या अटीच्या अधिन राहून अनुज्ञेय करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

# ‘फेस्कॉम’चा ४४ वा वर्धापन दिन सोहळा

शब्दांकन – सुरेश पवार
प्रसिध्दी प्रमुख, फेस्कॉम

‘फेस्काम’च्या नवनिर्वाचित कार्यकारिणीचे उत्साही अध्यक्ष-माननीय डॉ.अण्णासाहेब टेकाळे, जोडीला हरहुन्नरी, चैतन्यमूर्ती सचिव-माननीय-चंद्रकांतजी महामुनी- साथीला मुरब्बी अनुभवी मार्गदर्शक-माजी अध्यक्ष- माननीय अरुणजी रोडे-दत्त जयंतीच्या पूर्वसंध्येला ‘फेस्कॉम’ च्या त्रैमूर्तींचा सळसळता उत्साह जणूं भरभरून वाहत होता, सोबतीला, फेस्कॉम चे नांदेड अधिवेशन यशस्वीरित्या हाताळणारे -उपाध्यक्ष माननीय अशोकजी तेरकर, या सर्वांच्या आनंदाला जणूं उधाण आले होते. सोहळ्याचा बिगूल दिवाळीतच वाजला होता, त्यामुळे अनेक ज्येष्ठ बंधूभगिनी उत्साहाने भवनांत प्रवेशत होते, त्यांचा आनंद चेहऱ्यावर द्विगुणीत होत होता. तळमजल्यावर येणाऱ्या अभ्यंगतांचे, नांव नोंदणी समवेत, शुभेच्छा देत, हाती पेढा ठेऊन तोंड गोड केले जात होते.

दर्शनीच ४४ व्या अधिवेशनात, प्रवेशकर्त्या ज्येष्ठांचे स्वागत करणारी, रंगीबेरगी रंगात नटलेली आकर्षक रंगावली, सर्वांचे चित्त वेधून घेत होती. जिन्याच्या प्रत्येक पायरीवरही रांगोळीचा शिडकावा - सोबत चित्ताकर्षक फुलांच्या सजावटीमुळे किनखापी शामियाना सजला असावा असा संभ्रम निर्माण होत होता. कार्यक्रमाची सुरुवात, सांस्कृतीक कार्यक्रमाने झाली, ईशस्तवन आराधना पश्चात, हिन्दी-मराठी गाण्याची लज्जत चाखत, चपखल नृत्यासमवेत अभिनयाची बरसात भगिनींनी सादर केलेली कला केवळ लाजवाब... तेवढ्यात ज्यांची सर्वजण आतुरतेने वाट पहात होते, ते प्रमुख अतिथींच्या आगमनाची चाहूल, फटाक्यांच्या ध्वनि निनाद, व आतषबाजीच्या गंधाच्या कंपनाची ललकार देत.. माननीय- गणेश नाईक साहेब, आमदार व माजी मंत्री महाराष्ट्र यांचे आगमन झाले. कांही थोडा वेळ प्रमुख अतिथी यांनीही सांस्कृतिक कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. मंगल शंखध्वनी घुमताच, मान्यवर प्रमुख अतिथी समवेत, फेस्कॉम अध्यक्ष-अण्णासाहेब टेकाळे, आईस्कॉन प्रेसिडेंट- श्री, विश्वासराव भदाणे, सामाजिक संस्था अध्यक्ष- श्री, दिगंबर चापके, फेस्कॉम माजी अध्यक्ष-अरुण रोडे, उपाध्यक्ष-अशोक तेरकर, मुख्य सचिव चंद्रकांत महामुनी या मान्यवरांचे शुभहस्ते दीप्रज्वलन साकार झाले. विनंतीवरुन मान्यवरांचे मंचावर आगमन व महाराष्ट्र गौरव गीत व स्वागत गीत झाले. मान्यवरांचा सविस्तर परिचय करीत सत्कार सोहळा पार पडला. शुभहस्ते मान्यवरांचे सत्कार- मा,गणेश नाईक साहेब- यांचा फेस्कॉम तर्फे अण्णासाहेब टेकाळे,आईस्कॉन तर्फे विश्वासराव भदाणे यांनी सत्कार केले. मा. विश्वासराव भदाणेसाहेब - अशोक तेरकर, मा. दिगंबर चापके साहेब- चंद्रकांत महामुनी, मा.अरुण रोडे साहेब-विवेक देशपांडे, सोहळ्याचे प्रास्ताविक करीत कार्यक्रमाचे प्रयोजन मुख्य सचिव चंद्रकांत महामुनी यांनी विदीत केले.

११ व १२ जानेवारी २०२५ ला लातूर येथे आयोजीत ३४ व्या, फेस्कॉम अधिवेशनाची सविस्तर माहिती अधिवेशन कार्यवाह प्रकाश घादगिने यांनी सांगीतली. नुकत्याच फेस्कॉमने आयोजीत केलेला सृजनशिल उपक्रम ‘फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी’ या विषयावर फेस्कॉम मासिक मुखपत्र मनोहारी मनोयुवा ने विशेषांक प्रकाशित केला, तसेच यावल समाचार दैनिकाने प्रकशित केलेल्या वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन प्रमुख अतिथी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. मान्यवर श्री. अरुण रोडे साहेब, श्री. दिगंबर

चापके साहेब, श्री. विश्वासराव भदाणे साहेब यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. फेस्कॉम च्या १४ प्रादेशिक विभागवार, उत्कृष्ठ महिला महिला कार्यकर्ती, उत्कृष्ठ पुरुष कार्यकर्ता, उत्कृष्ठ ज्येष्ठ नागरिक संघ यांचा प्रमुख अतिथी माननीय आमदार गणेश नाईक यांच्या शुभहस्ते, अतुलनीय वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल, प्रशस्तिपत्राने सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणांत डॉ.अण्णासाहेब टेकाळे यांनी आजपर्यंत फेस्कॉमने ज्येष्ठांकरिता केलेल्या कामाचा आढावा घेत, स्वातंत्र्याच्या ७५ व्या महोत्सवाची वर्षाची भेट म्हणून, महाराष्ट्रात ७५ वयावरीत वरील ज्येष्ठांना मोफत प्रवास, व सर्व महिलांना अर्धे दरांत प्रवास, सर्व आरोग्य विषयक सवलती, आरोग्य विमा, पोलिस ठाणे प्रतिनिधी, या विषयी समग्र माहिती देत, फेस्कॉम ने केलेल्या कामाचा उहापोह केला. केंद्र सरकारने बंद केलेल्या अर्ध रेल्वे भाड्याचा उल्लेख करीत याबाबत फेस्कॉम करीत असलेल्या उपक्रमाच्या पाठपुराव्याची माहिती दिली. फेस्कॉम चे ५५०० संघ असून त्यांत ५०० महिला संघ असल्याची माहिती दिली. ही संख्या दहा हजारावर नेण्याचे मनोगत व्यक्त केले, फेस्कॉमचे १४ प्रादेशिक विभाग म्हणजेच फेस्कॉमचे १४ भक्कम पिलर असल्याचे विदीत केले.

प्रमुख अतिथी माननीय आमदार गणेश नाईक यांनी आपले ज्येष्ठांविषयी सकारात्मक मनोगत व्यक्त करतांना, आजची ज्येष्ठांची विदारक स्थिती व त्यांत सातत्याने होत असलेली वाढ या विषयी चिंता व्यक्त करीत, त्याकरिता आपण आतापर्यंत केलेल्या कार्याची माहिती दिली. या प्रश्नी माननीय मुख्यमंत्री साहेबांकडे याविषयी चर्चा व स्वतंत्र खाते स्थापित करण्याची गरज असल्याचे मागणी करण्यात येईल, असे प्रतिपादित केले. नवी मुंबई महानगर पालिकेत ज्येष्ठांच्या अडीअडचणीच्या वेळी स्वतंत्र्य कक्ष स्थापन केला आहे. त्याच धर्तीवर जिल्ह्यापासून ग्रामीण स्तरावर कक्ष उघडण्याची मनिषा जाहीर केली. ज्येष्ठ नागरिक संघ उभारणी, रेल्वे सवलत मिळवणे, याकरता स्वतः प्रयत्नशील राहून हे प्रश्न मार्गी लावण्याचा त्यांनी पुनरोच्चार केला. जमलेल्या सर्व प्रादेशिक अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, जमलेल्या सुमारे ४०० सभासद बंधूभगिनींचे, उपाध्यक्ष श्री. अशोक तेरकर यांनी मनपूर्वक आभार मानले. राष्ट्रगीताने सोहळ्याची सांगता झाली.

फेस्कॉम कार्यकारणी,१४ प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष, सचिव, सन्मानार्थी बंधू-भगिनी, महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून आलेल्या ४०० वर ज्येष्ठांचा मेळावा नेरुळ नगरीने पाहिला. खचाखच भरलेले श्रीगणेश सभागृह लहान वाटत होते, मिळालेला प्रतिसाद पहाता, हा सोहळा नव्हे.. हा तर ज्येष्ठांचा अभूतपूर्व आनंद मेळावा म्हणणेच संयुक्तिक ठरेल. कार्यक्रम उपरांत बासुंदी-पुरीच्या सुग्रास भोजनाने, तृप्तेचा ढेकर देत ज्येष्ठ नागरिक आपापल्या घराकडे परतत होते. प्रादेशिक अध्यक्ष श्री. सुरेश पोटे-मुंबई, श्री.विलास काळे-कोंकण,, श्री.हनुमंत कुंभार-पुणे,, डॉ. हंसराज वैद्य-उत्तर मराठवाडा,, श्री.दामोदर थोरात-दक्षिण मराठवाडा, श्री.सुधिर भगत-पूर्व विदर्भ, श्री.विजय चंदावार-वनवैभव, श्री.अशोकनाना होळकर-नाशिक, श्री.शब्बीरखान पठाण-अहिल्यानगर, श्री. अशोक खेडकर-बुलढाणा, श्री.रामचंद्र पाटील-कोल्हापूर, प्रादेशिक अध्यक्ष, सचिव व सभासद बंधूभगिनींचे आभार...

* * *

## 'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा



मिरज येथील श्रीमती आक्काताई केशव म्हेत्रे (वय वर्षे १०२) यांचा फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल चे वतीने सामाजिक कार्यकर्ते मा. संभाजीराव मेंढे आणि फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान यांचे हस्ते शाल, श्रीफळ व बुके देवून नववर्षानिमित्त शुभेच्छांसह सत्कार.
सोबत फहिम खान व १००+ आजींचे कुटुंबीय.



तासगाव तालुक्यातील सावर्डे येथील श्रीमती कलावती नारायण माने (वय वर्षे १०७) यांचा मनोयुवा कौन्सिल चे वतीने सत्कार करतांना उपाध्यक्ष अंजुमन खान व नाना माने. सोबत साहित्यिक मोहन माने, अब्दुल सय्यद, अशोक जाधव व १००+ चे कुटुंबीय.



सांगली येथील श्रीमती तायव्वा यल्लाप्पा मंजलकर (वय वर्षे १०५) यांचा फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल चे वतीने सहकार खात्यातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी भरतकुमार पाटोळे यांचे हस्ते यथोचित सत्कार करून नववर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या. सोबत फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान, मारूती बालेशगोल, दादासाहेब यल्लाप्पा मंजलकर, सून सौ.सुमित्रा दादासाहेब मंजलकर, कौन्सिल चे कोषाध्यक्ष चॉन्दसाहेब गवंडी व मुबारक खान.



तासगाव तालुक्यातील सावर्डे येथील श्रीमती पार्वती तुकाराम माळी (वय वर्षे १०५) यांचा मनोयुवा कौन्सिल चे वतीने सत्कार करतांना उपाध्यक्ष अंजुमन खान. सोबत साहित्यिक मोहन माने, अब्दुल सय्यद, अशोक जाधव व १००+ चे कुटुंबीय.

---

मिरज येथील श्री.किसन म्हादू म्हैशाळे (वय वर्षे १०६) यांचा फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल चे वतीने माहिती अधिकार तज्ञ व सामाजिक कार्यकर्ते मा.शाहीन शेख व फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान यांचे हस्ते शाल, श्रीफळ व बुके देवून नववर्षानिमित्त शुभेच्छासह सत्कार. सोबत मा.संभाजीराव मेंढे, मनोज कांबळे, फहिम खान व १००+ आजोबांचे कुटुंबीय.



Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2024-2026


## 'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा



सुभाषनगर ता. मिरज जि. सांगली येथील आधार ज्येष्ठ नागरिक संस्थेचे वतीने ध्वज दिनाचे दिनांक ११/१२/२०२४ चे कार्यक्रम प्रसंगी जिल्हाधिकारी मा. राजा दयानिधी साहेब यांचेकडे ध्वज निधीसाठी र.रू. ३,५००/-ची देणगी देतांना अंजुमन खान. सोबत शौर्य पदक विजेते कर्नल मा. नवले सर, ग्रुप कॅप्टन मा.वालावलकर सर.

खानापूर तालुक्याचे तहसीलदार मा.योगेश्वर टोपे, नायब तहसीलदार विजय साळूंखे यांचे हस्ते ज्येष्ठ नागरिक ओळखपत्रे स्विकारतांना प.पु.साने गुरूजी संघाचे कार्यवाह सुनील खलीपे, रेणावी संघाचे कार्यवाह गजानन गुरव व मनोयुवा कौन्सिलचे सदस्य यशवंत जगताप. विटा, रेणावी आणि शेडगेवाडी संघातील अनुक्रमे ६, ७, व २५ मंजूर ओळखपत्रे प्राप्त. रेणावी संघाचे अध्यक्ष अनिल वेळापूरे, महिला संघाच्या अध्यक्षा सौ. सुषमा गुरव व शेडगेवाडी संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव खोडसे उपस्थित. .मार्गदर्शन: फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, मनोयुवा कौन्सिल.



नागपूर येथील श्रीकृष्ण ज्येष्ठ नागरिक मंडळातील कार्यक्रम प्रसंगी मंडळाचे वतीने २०२५ सालच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन फेस्कॉम उपाध्यक्ष अशोक तेरकर आणि फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख अंजुमन खान यांचे हस्ते करणेत आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष वसंत कळंबे, रमेश वाघमारे, हिरालाल गडेरिया, भैया टाले, देवचंद बोरकर, महिला आघाडी अध्यक्षा मेजर डॉ. सौ. निर्मलाताई कोरे आणि सौ. सुनिता तेरकर.

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐/मयत ☐/पत्ता सोडून गेले ☐/पोस्टमन बीट क्र.

**PRINTED MATTER**

प्रति,

______________________

______________________

______________________

प्रेषक :
**श्री. अंजुमन खान**
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४